विविधा

# आंतरमशागतीसाठी उपयुक्त अवजारे





**वैभव सूर्यवंशी**
विषय विशेषज्ञ
(मो.नं. ९७३०६९६५५४)
कृषी विज्ञान केंद्र,
ममुराबाद फार्म, जळगाव

पिकांच्या आंतरमशागतीसाठी विविध अवजारांचा उपयोग केला जातो. त्यांची वैशिष्ट्ये अशी सांगता येतील.

**विळा :** गहू, ज्वारी व गवत यांची कापणी जमिनीलगत करता येते. दातेरी पात्यामुळे या विळ्याला धार लावायची गरज नाही. वजनास हलका आणि अधिक चांगली पकड असून समतोल साधून सहज कापणी होते. एका तासामध्ये २ गुंठ्याची कापणी करता येते.

**दातेरी हात कोळपे :** पिकाच्या दोन ओळीत निंदणी करण्यासाठी, मजुराला उभ्याने कोळपे दोन्ही हाताने मागे पुढे ढकलून चालविता येते. त्यामुळे कामाचा शीण कमी होतो व मजुराची कार्यक्षमता, उत्साह टिकून काम वेगाने होते. कोळप्याचे पाते १५ सें.मी. लांबीचे असते. त्यामुळे दोन ओळींत १५ सें.मी. पेक्षा जास्त अंतर असलेल्या पिकातसुद्धा या कोळप्याने निंदणी, खुरपणी करता येते. कोळप्यामुळे साधारणपणे ३ सें.मी. खोलीपर्यंत जमिनीची खुरपणी होते. सर्व प्रकारच्या पिकात आणि सर्व प्रकारच्या हलक्या, मध्यम तसेच भारी जमिनीत कोळपे सारख्या क्षमतेने वापरता येते. या हातकोळप्याचे वजन कमी म्हणजे ७ किलो असल्याने सहज उचलून नेता येते. एक मजूर दिवसाकाठी ०.२ हेक्टर क्षेत्राची निंदणी-खुरपणी करू शकतो.

**सायकल कोळपे :** याचा उपयोग १५ सें.मी. पेक्षा जास्त अंतर असलेल्या पिकात कोळपणी, निंदणी, खुरपणी करण्याकरता होतो. ५ ते ७ सें.मी. पर्यंत जमिनीत खुरपणी करता येते. एक मजूर दिवसाकाठी ०.२ हेक्टर क्षेत्राची निंदनी, खुरपणी सहजपणे करू शकतो.

**मोगी कोळपे :** याचा उपयोग २० सें.मी पेक्षा जास्त अंतर असलेल्या पिकात कोळपणी, नोंदणी करण्यासाठी होतो. याद्वारे मातीसुद्धा लावता येते. या कोळप्याबरोबर तीन वेगवेगळे पास दिलेले आहेत, ज्याच्या वापर पिकाच्या दोन ओळीतील अंतरानुसार करत येतो.

**पॉवर वीडर :** लहान शेतकऱ्यांची गरज ओळखून बाजारपेठेत आता पॉवर वीडर, उपलब्ध झाले आहेत. या अवजारांमुळे मजुरी तसेच वेळेत बचत होते. कामाचा दर्जा चांगला राहतो. भारतातील शेतीयोग्य जमीनीचे क्षेत्रफळ जवळपास एकूण जमिनीच्या ५६.७८% एवढे आहे. परंतु, वाढत्या लोकसंख्येमुळे व वाढत्या शहरीकरणामुळे भारतातील शेतीयोग्य जमिनीचे क्षेत्रफळ सतत घटत आहे. शेतीच्या मशागतीमध्ये आता ट्रॅक्टर, पॉवर टिलर अशी आधुनिक यंत्रसामुग्री जवळपास सर्वच शेतकरी वापरू लागले आहेत. याचबरोबर शेतीमध्ये होणार आंतरमशागतीचा खर्च कमी करावयाचा असेल तर शेतकऱ्यांनी कृषी विद्यापीठे, केंद्रीय संस्था, वेगवेगळ्या कंपन्या यांची संशोधित स्वयंचलित अवजारे आजकाल बाजारात उपलब्ध आहेत. तसेच मजुरांचा अपुरा पुरवठा यामुळे काही संशोधक शेतकऱ्यांनी आंतरमशागतीची अवजारे तयार केली आहेत.

शेतामध्ये, बांधावर तसेच रस्त्याकडेला वाढणारे तण ही शेतकऱ्यांपुढील मोठी समस्या आहे. हे वाढलेले तण वेळोवेळी काढणे गरजेचे असते. जेणेकरून पिकातील गवत पिकाशी खत, पाणी, सूर्यप्रकाश इ. साठी स्पर्धा करत नाही. कृषी मजुरांची उपलब्धता कमी झाल्याने शेतकरी तणनाशकाचा मोठ्या प्रमाणात वापर करतात; परंतु त्यामुळे पिकांवर थोड्याफार प्रमाणात पण जमिनीवर दीर्घकालीन परिणाम होतो, म्हणून पॉवर वीडर हे अवजार वापरणे योग्य ठरेल. पॉवर वीडर हे ओळ पद्धतीने लावल्या जाणाऱ्या पिकात, उद्यानविद्या आणि भाजीपाला पिकात निंदणी करण्यासाठी वापरले जाते. ज्या पिकांच्या सरींमधील अंतर ६०-७० सें.मी. पेक्षा जास्त आहे अशा पिकांमध्ये तण काढणीसाठी पॉवर वीडरचा वापर उपयुक्त ठरू शकतो. उदा. नारळ, केळी, कपाशी, ऊस, डाळिंब, संत्री, द्राक्षे इत्यादी विविध पिकांसाठी आपण पॉवर वीडरचा वापर करू शकतो. विविध प्रकारचे पॉवर वीडर तीन ते सहा अश्वशक्तीपर्यंत उपलब्ध आहेत. पॉवर वीडरमध्ये इंजिन, इंधन टाकी, ब्लेड, चेन किंवा बेल्ट ट्रान्समिशन, हॅन्डल विथ स्पीड कंट्रोल इ. भाग आहेत. ■